## ३४. विद्यापीठीय ग्रंथपाल, उपग्रंथपाल व सहायक ग्रंथपाल तसेच महाविद्यालयीन ग्रंथपाल ही पदे बिगरसुट्टीची शैक्षणिक पदे म्हणून घोषित करण्याबाबत शासनाचा आदेश

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : युएसजी १९९५/(१९३/९५) विशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १४ नोव्हेंबर, १९९५.

**शासन निर्णय :** महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ (१९९४ चा कायदा क्रमांक ३५) मधील प्रकरण १ च्या कलम २(३४) प्रमाणे व दिनांक ३० ऑगस्ट, १९९५ च्या स्पष्टीकरण आदेशानुसार शिक्षण संवर्गाची व्याख्या दिलेली आहे. यातील ग्रंथपाल म्हणजे विद्यापीठीय ग्रंथपाल, उपग्रंथपाल व सहायक ग्रंथपाल तसेच महाविद्यालयीन ग्रंथपाल यांना शिक्षक संवर्गात समाविष्ट करण्यात आले असल्यामुळे त्यांना शिक्षक संवर्गाकरिता असलेले आदेश लागू होतात.

२. शासन आता या निर्णयान्वये महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २ (२१) अन्वये असलेल्या अधिकारांचा वापर करून विद्यापीठीय ग्रंथपाल, उपग्रंथपाल व सहायक ग्रंथपाल तसेच महाविद्यालयीन ग्रंथपाल या पदांना बिगरसुट्टीची शैक्षणिक पदे म्हणून घोषित करीत आहे; कारण दीर्घ सुट्ट्यांच्या कालावधीत ग्रंथालये चालू ठेवणे हे शिक्षक व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दृष्टिकोनातून हितावह आहे. यामुळे शिक्षक संवर्गांना मिळणाऱ्या दीर्घ सुट्ट्या त्यांना मिळणार नाहीत. त्यांना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू असलेले सेवाशर्ती संबंधित प्रमाणसंहिता १९८४ मधील रजेचे नियम लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सही/-

**(त्रिं. ब. सेन)**

उपसचिव, महाराष्ट्र शासन

## ५.११ ग्रंथपालाच्या कामाचे तास ठरविण्याबाबत राज्य शासनाचा खुलासा.

महाराष्ट्र शासन

क्रमांक - एनजीसी १२९७ / ८२७३८/(४३०३)/ विशि ४

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ११-४-१९९७.

प्रति,

प्राचार्य,

एल. डी. ए. कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स,

नागपूर.

**विषय :** महाविद्यालयीन ग्रंथपालांच्या कामाचे तास निश्चित करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांसदर्भात आपले क्रमांक टेक/एज्यु/ईएमएफ/डिपार्टमेंट १९९६-९७/२७७, दि. २२-३-१९९७ चे पत्र पाहावे. या संदर्भात मला आपणास असे कळविण्याचे आदेश आहेत की, महाविद्यालयीन ग्रंथपालांचा समावेश दिनांक ३० ऑगस्ट, १९९५ च्या शासन आदेश क्रमांक - युएसजी-१९९५/ (१५९/९५) युनि-३ अन्वये शिक्षक या व्याख्येत करण्यात आला आहे. तसेच दिनांक १४ नोव्हेंबर, १९९५ च्या शासन निर्णय क्रमांक - युएसजी -१९९५ /(१९३/९५) विशि-३ अन्वये महाविद्यालयीन ग्रंथपाल हे बिगरसुट्टीचे शैक्षणिक पद म्हणून घोषित करण्यात आले आहे. या संदर्भात आपणास असे स्पष्ट करण्यात येते की, महाविद्यालयीन ग्रंथपालांना आठवड्यात ४२ तास काम करणे हे बंधनकारक आहे. सोबत संदर्भांकित शासन आदेश व निर्णयाच्या प्रती माहितीस्तव जोडण्यात येत आहेत.

आपली विश्वासू,

सही /-

**(सुवर्णा सि. खरात)**

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

---

प्रत माहितीसाठी अग्रेषित :

सर्व विद्यापीठांचे कुलसचिव.

## ९.१० विद्यापीठीय ग्रंथपाल, उपग्रंथपाल व सहायक ग्रंथपाल तसेच महाविद्यालयीन ग्रंथपाल ही पदे बिगरसुट्टीची शैक्षणिक पदे म्हणून घोषित करण्याबाबत शासनाचा आदेश

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : युएसजी १९९५/(१९३/९५) विशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १४ नोव्हेंबर, १९९५.

**शासन निर्णय :** महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ (१९९४ चा कायदा क्रमांक ३५) मधील प्रकरण १ च्या कलम २(३४) प्रमाणे व दिनांक ३० ऑगस्ट, १९९५ च्या स्पष्टीकरण आदेशानुसार शिक्षण संवर्गाची व्याख्या दिलेली आहे. यातील ग्रंथपाल म्हणजे विद्यापीठीय ग्रंथपाल, उपग्रंथपाल व सहायक ग्रंथपाल तसेच महाविद्यालयीन ग्रंथपाल यांना शिक्षक संवर्गात समाविष्ट करण्यात आले असल्यामुळे त्यांना शिक्षक संवर्गाकरिता असलेले आदेश लागू होतात.

२. शासन आता या निर्णयान्वये महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २ (२१) अन्वये असलेल्या अधिकारांचा वापर करून विद्यापीठीय ग्रंथपाल, उपग्रंथपाल व सहायक ग्रंथपाल तसेच महाविद्यालयीन ग्रंथपाल या पदांना बिगरसुट्टीची शैक्षणिक पदे म्हणून घोषित करीत आहे; कारण दीर्घ सुट्ट्यांच्या कालावधीत ग्रंथालये चालू ठेवणे हे शिक्षक व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दृष्टिकोनातून हितावह आहे. यामुळे शिक्षक संवर्गांना मिळणाऱ्या दीर्घ सुट्ट्या त्यांना मिळणार नाहीत. त्यांना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू असलेले सेवाशर्ती संबंधित प्रमाणसंहिता १९८४ मधील रजेचे नियम लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सही/-

**(त्रिं. ब. सेन)**

उपसचिव, महाराष्ट्र शासन